आरोग्य सेवा संचालनालय
(महाराष्ट्र राज्य)
*आरोग्य भवन*, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, पी.डिमेलो रोड, मुंबई- ४००००१

| कार्यालय | दूरध्वनी | |
| --- | --- | --- |
| संचालक (वैयक्तिक) | २२६२१०३१-३५ | Website : http://maha-arogya.gov.in |
| सहसंचालक (रुग्णालये-राज्यस्तर) | २२६२१००६ | Email : dhs 2005@rediffmail.com (DHS) |
| सहसंचालक (प्राआकेंद्र-जिपस्तर) | २२६११४७१ | Email : pde.dhs@gmail.com (PDE) |
| | २२६२०२४९ | Fax No. 022-22621036(D-7A) /22620234 (DHS) |


752-793

| महत्त्वाचे परिपत्रक | क्रसंआसे/कक्ष-७अ/टि-७/न.क्र. /प्राआके-उपकें-बांधकाम/१५<br>दिनांक - 13 /०३/२०१५ |
| --- | --- |

प्रति,
उपसंचालक आरोग्य सेवा, ............. (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,................ (सर्व)

विषय :- प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र बांधकाम करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे.

संदर्भ :- १) क्र.संआसे/निविमु/ग्रारु/प्राआकें/उपकेंद्र/बांधकाम/कक्ष-७,दि.२०.८.१९९३
२) क्र.संआसे/निविमु/ग्रारु/प्राआकें/उपकेंद्र/बांधकाम/कक्ष-७/टि-१/९४, दि.२१.७.१९९४
३) संचालनालयाचे पत्र क्र.संआसे/जिल्हास्तर/प्राआकें-उपकें/बांधकाम/टि-७/ कक्ष-७ अ/ १३, दि.१८/८/२०११
४) ग्रामविकास व जलसंधारण विभाग यांचा शासन निर्णय क्र.झेडपीए-२०१३/ प्रक्र.६८०/वित्त-९,दि.१९.३.२०१२

राज्यातील नव्याने स्थापन झालेली प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र यांची बांधकामे तसेच जुनी/मोडकळीस आलेली इमारत पाडून नव्याने बांधकाम करणे तसेच जुन्या इमारतींच्या दुरुस्तीबाबत विविध जिल्हयांकडून संचालनालयाकडे परवानगीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येतात. तसेच बृहत आराखडया अंतर्गत मंजुर संस्थांच्या बांधकामाचेही प्रस्ताव संचालनालयास प्राप्त होतात.

संदर्भ क्रमांक ३ अन्वये प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र बांधकाम करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली आहेत. या तत्त्वानुसार तसेच खालीलप्रमाणे प्रा.आ.केंद्र/ उपकेंद्र स्थापनेसाठी कार्यवाही करण्यात यावी.

प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र बांधकामाबाबतची मार्गदर्शक तत्वे तीच राहतील मात्र बांधकामास परवानगीचा प्रस्ताव या संचालनालयाकडे पाठविण्यापूर्वी खालील गोष्टींची पूर्तता झाली असल्याची खात्री करुनच प्रस्ताव पाठविण्यात यावे.

१) बृहत आराखडयातील एकूण मंजुर संस्थांचे बांधकामासाठी वर्षवार नियोजन करण्यात यावे. नियोजन करताना मोफत जागा कधी उपलब्ध होईल या बाबीचा विचार करण्यात यावा.
२) आरोग्य संस्था मंजूरीच्या ठिकाणी नविन बांधकामासाठी ग्रामपंचायतीने मोफत जागा देणे अपेक्षित आहे. ग्रामपंचायतीमार्फत मोफत जागा उपलब्ध न झालेस मोफत शासकीय जागा मिळणेकामी मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे संपर्क साधावा. व बांधकामासाठी पुरेशी जागा उपलब्ध करुन घ्यावी. प्राप्त जागा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचे नांवे झाल्याचा ७/१२ चा उतारा ताब्यात घेतल्यानंतरच प्रशासकीय मान्यता व बांधकामाबाबत पुढील कार्यवाही करावी.
३) प्रस्ताव पाठविताना आरोग्य संस्था मंजुरीचा शासन निर्णय आणि सदर संस्था बांधकामासाठी अनुदान कोणत्या योजनेमधून करण्यात येणार आहे त्याचा उल्लेख करण्यात यावा. व निधी उपलब्धतेची खात्री करावी.(उदा.जिल्हा नियोजन विकास मंडळ/राष्ट्रीय आरोग्य अभियान/मानव विकास कार्यक्रम /आदिवासी उपयोजना इत्यादी). निधी उपलब्ध असल्याशिवाय प्रस्ताव पाठवू नये.
४) नविन आरोग्य संस्थेसाठी जागा उपलब्ध झाल्यानंतर तालुकास्तरावरुन बांधकामाचे अंदाजपत्रक उपअभियंता यांचेमार्फत व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद यांचे शिफारसीनुसार प्राप्त करुन घ्यावे. प्राप्त अंदाजपत्रकातील रक्कम व बांधकाम/दुरुस्तीचा तपशील याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी शहानिशा करावी.

५) ग्राम विकास व जलसंधारण विभागाच्या दि.१९.३.२०१२ शासन निर्णयाद्वारे जिल्हा परिषदांकडील विकास योजना तसेच बांधकामे व दुरुस्ती याबाबत प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देणेबाबतचे अधिकार हे प्रदान करण्यात आले आहेत. कार्यालय प्रमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी/अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, अध्यक्ष स्थायी समिती, सभापती विषय समिती, स्थायी समिती व जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा यांना प्रशासकीय मान्यता देणेबाबतच्या अधिकाराच्या मर्यादेबाबत सदर शासन निर्णयात नमूद केलेले आहे. बांधकाम/दुरुस्ती यांचे अंदाजपत्रकीय रकमेनुसार सदर कामाला जिल्हा परिषद स्तरावर सक्षम प्राधिकाऱ्याची प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.

६) प्रशासकीय मान्यता घेतल्यानंतर व अनुदान उपलब्धतेची खात्री झाल्यानंतर तसेच नविन बांधकामाचे बाबत जागा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे नावे झाल्याची खात्री करुन बांधकाम सुरु करण्याचे मान्यतेबाबत प्रस्ताव टाईप प्लॅनसह संचालनालय आरोग्य सेवा यांचेकडे सादर करावा.

७) संचालनालयाची टाईप प्लॅनसह परवानगी प्राप्त झाल्यानंतरच बांधकामाबाबतची पुढील कार्यवाही जिल्हा परिषद स्तरावरुन करण्यात यावी.

८) आरोग्य संस्थांची बांधकाम/दुरुस्ती ही कामे बांधकाम विभाग जिल्हा परिषद यांचे मार्फत होत असली तरीदेखील काम सुरु असताना व काम पूर्ण झाल्यानंतर या कार्यालयाचे पत्र दि.१८/८/२०११ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार बांधकामाची पाहणी आरोग्य विभागामार्फत करावी. व आढळलेल्या त्रुटी बांधकाम विभागाच्या निदर्शनास आणाव्यात.

९) संचालनालयाच्या दि.१८/८/२०११ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनेमध्ये जी कामे नमूद केलेली आहेत तीच कामे करण्यात यावीत.

१०) शासन निर्णय ग्राम विकास क्र.जिपई-२०११/प्र.क्र.१९८/परा ७/दि.९/१/२०१२ अन्वये मोडकळीस आलेल्या तथा धोकादायक इमारती पाडण्यासंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आले आहे. त्यामुळे असे बांधकाम पाडण्यास परवानगी मागण्यापूर्वी या शासन परिपत्रकातील सर्व बाबींची पूर्तता करुन तशी कागदपत्रे जोडूनच प्रस्ताव बनवावे.

११) ग्राम विकास शासन पूरक परिपत्रक क्र.जिपई/२०११/प्र.क्र.१९८/परा ७/दि.८/६/२०१२ मध्ये रु.१०.०० लाखाच्या पुस्तकी मूल्याच्या इमारतीचे बांधकाम पाडण्यास परवानगी देण्याचे अधिकार प्रादेशिक कार्यालय प्रमुखाकडे आहे तर २०.०० लाखाच्या पुस्तकी मुल्याच्या इमारती पाडण्याचे अधिकार विभाग प्रमुखांना आहेत. तर त्यापुढील जादा पुस्तकी मुल्याच्या इमारत पाडण्याचे अधिकार शासनाकडे आहेत. त्यामुळे धोकादायक इमारतीचे बांधकाम विभागाकडून घसारा पुस्तकी मुल्य काढण्यात यावे व त्यानुसारच संबंधित कार्यालयांकडे मंजूरीसाठी प्रस्ताव पाठवावे.

१२) बृहत आराखडा शासन निर्णय दि. १७.०१.२०१३ मध्ये नमूद केलेनुसार नवीन आरोग्य संस्थेचे बांधकाम ७५ टक्के पूर्ण झाल्यानंतर पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव आरोग्य संचालनालयाकडे पाठविण्यात यावा.

संचालक
आरोग्य सेवा, मुंबई

प्रत माहितीस्तव :-
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,................(सर्व)
कार्यकारी अभियंता, (बांधकाम विभाग) जिल्हा परिषद,................(सर्व)

प्रत माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी-
सहसंचालक आरोग्य सेवा (जिपस्तर), मुंबई